REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची वास्तविकता एक अभ्यास''

सुनील प्र. घुगल
असिस्टंट प्रोफेसर व अर्थशास्त्र विभाग प्रमुख ,
तायवाडे कॉलेज, कोराडी जि. नागपूर.



**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक , शैक्षणिक, राजकीय व आर्थिक विषयांवर आपले विचार स्पष्टपणे मांडले त्यांनी 1943 मध्ये इस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाराचा एकाधिकार नष्ट करून ब्रिटीश जनतेसाठी भारताशी व्यापार करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. रूपयाच्या अवमुल्यना बाबत चांदीचा अतिरिक्त पुरवठा जबाबदार नाही तर जगातील प्रमुख देशांनी रौप्यमानकाचा त्याग केल्यामुळेच रूपया पौंड विनिमय दरात विसंवाद निर्माण झाला. सोनेचांदीचा विनिमय दर स्थिर ठेवणे कठीण झाल्यामुळे भारताचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असे डॉ. आंबेडकर यांनी म्हटले

शेती हे राष्ट्रीय उत्पादनाचे एक मोठे साधन आहे. शेतीला आर्थिक विकासाचे साधन म्हणुन विशेष महत्व दिले पाहीजे. जलसंपत्तीच्या नियोजनाबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात की नदीला येणाऱ्या महापुरांपासुन संरक्षण करणे एवढाच मर्यादित उद्देश दामोदर नदी खोरे योजनेचा नव्हता तर या योजनेद्वारे शेतीसाठी सिंचन विद्युतनिर्मिती आणि नौकायन असा तिहेरी उद्देश होता.

राष्ट्रीयीकरणाला डॉ. आंबेडकरांचा विरोध नव्हता शेतजमीन आणि अवजड उद्योगधंदे यावर सामुदायीक मालकी असावी अशी त्यांची धारणा होती उत्पादनाचे लोकशाही पध्दतीने जातीभेद न करता वाटप करावे.

## प्रस्तावणा :—

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या ज्ञानसुर्याने भारतभर आणि भारताबाहेरही विसावे शतक प्रकाशमान केले. येथे हजारो वर्षे चातुर्वण्याच्या आणि जातियतेच्या घाणीत, चिखलात रूतलेल्या कोटयावधी लोकांना त्या ज्ञानसुर्याच्या विचारकिरणांनी मुक्त केले वर काढले आणि स्वच्छ केले. बाबासाहेबांचा विचार स्वीकारणाऱ्या समाजाच्या जीवनाला अर्थ प्राप्त झाला कुत्र्या मांजरापेक्षा किंवा किडे मुंग्यांपेक्षाही जे हिन आणि अस्तित्वहिन जीवन जगत होते, त्यांना माणुसपणाचे हक्क प्राप्त झाले ही सर्व किमया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य कर्तृत्वान, चळचळीने आणि तत्वज्ञानाने केली. प्रत्येक भारतीयांच्या मनात राष्ट्रवाद निर्माण व्हावा आणि राजकीय स्वातंत्र्यांची गोड फळे सर्व स्तरातील जनतेला चाखावयास मिळावी असा त्यांचा अथक सामाजिक प्रयत्न होता. माणूस त्यांच्या विकासाचा केंद्रबिंदू होता त्यांनी सर्वांना हक्काची जाणीव करून देताना समाज आणि देशाच्या प्रती असलेल्या कर्तव्याचीही जाणीव करून दीली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक विषयावर आपले तत्वज्ञान (विचार) स्पष्टपणे मांडले भारताच्या ऐक्याला पूरक असलेला विचार राज्यघटनेत मांडला. सामाजिक आर्थिक समता

सांगणारा, प्रत्येक नागरीकांचे स्वातंत्र्य जपणारा, बंधुभाव वाढीस लागणारा आणी सर्वाना सारखा न्याय आणि समान संधी देणारा विचार बाबासाहेबांनी राज्यघटनेत समाविष्ट केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते त्यांनी आर्थिक विषयावरील शेकडो ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. त्यांच्या एम. ए., एम. एस्सी. व पीएच. डी. या सर्व पदव्या अर्थशास्त्र या विषयाच्या आहेत इतकेच नव्हे तर डी. एस्सी. ही उच्चतम पदवी देखील 'The Problem of the Rupee' या मौद्रीक अर्थशास्त्रावरील प्रबंधावर त्यांना प्रदान करण्यात आली होती. डॉ. आबेडकर हे अर्थशास्त्राचे संशोधक आणि अभ्यासक असल्यामुळे त्यांच्या आर्थिक विचारांना अर्थशास्त्रीय पार्श्वभूमी आहे. त्यांनी अतिशय सखोल अध्ययन करून आर्थिक विषयावर सविस्तर विवेचन केले म्हणून त्यांचे आर्थिक विचार हे केवळ तात्कालिक स्वरूपाचे नाहीत त्यांच्या आर्थिक विचारांना वैश्विक महत्व आहे. त्याचे आर्थिक विचार खालीलप्रमाणे दिसुन येते

## संशोधन पध्दती :–

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीय साधनांचा वापर केला आहे. मासिके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, यांच्या साहाय्याने तथ्यसंकलन केले आहे.

## अभ्यासाची उदिश्टे :–

1. इस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनितीचा अभ्यास करणे.
2. रूपयाच्या प्रश्नाबाबत आंबेडकरांचा विचार अभ्यासने.
3. डॉ. आंबेडकरांच्या शेती व आर्थिक विकास या संबधी विचारांचा अभ्यास करणे.
4. शेतीचे राष्ट्रीयीकरणाबाबत डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा मागोवा घेणे.
5. दामोधर खोरे परियोजनेचा अभ्यास करणे.
6. विकासाच्या अर्थनीतीचा अभ्यास करणे.

## अभ्यासाची गृहिते :–

1. ब्रिटीश सरकारचे भारतातील धोरण आर्थिक पिळवणूकीचे आहे.
2. अनिर्बध चलनपुरवठयातून भाववाढ होवून आर्थिक स्थैर्य धोक्यात येते.
3. शेती हे आर्थिक विकासाचे साधन आहे.
4. शेतीच्या राष्ट्रीयीकरणामुळे देशातील शेती व शेतकऱ्यांचा सामुदायीक विकास होतो.

## इस्ट–इडिया कंपणीचे प्रशासन आणि अर्थनीती :–

डॉ. आबेडकरांनी 1792 ते 1858 या काळात ईस्ट इंडीया कंपणीच्या प्रशासन आणि वित्तनिती संबंधीच्या धोरणातील ऐतिहासिक आढावा घेतला कंपणीच्या धोरणातील बदलांचा भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला याचे विदारक आर्थिक विश्लेषण त्यांनी केले. इस्ट इंडिया कंपनीकडे भारताच्या व्यापाराचा एकाधिकार होता परंतू ही गोष्ट ब्रिटिश राज्यकर्त्याना आवडत नव्हती म्हणून या एकाधिकाराचा मोबदला म्हणून या ना त्या कारणांसाठी ब्रिटीस सरकार स्वतःचा फायदा करून घेण्याची संधी सोडत नव्हते परंतू त्यांची झळ मात्र भारतीय जनतेला सोसावी लागली ब्रिटिश सरकारने 1815 मध्ये कायदा करून कंपनी सरकारला प्रशासन आणि वित्त या दोन गोष्टित फारकत करण्यात भाग पाडले 1934 मध्ये ईस्ट इंडीया कंपनीचा व्यापाराचा एकाधिकार नष्ट करून ब्रिटिश जनतेसाठी भारताशी व्यापार करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. 1858 मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करून ब्रिटिश सरकारची सत्ता भारतात प्रस्थापित करण्यात आली.

1792 ते 1857 या काळात कंपनी सरकार आणि पर्यायाने ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेची पिळवणुक केली भारतीय जनतेवर विविध प्रकारचे कर लावण्यात आले होते जमिनीवरील कर विशेष जाचक होता. शेतकरी वर्ग या करांमुळे कसा भरडला गेला याचे विवेचन त्यांनी केले कंपनी सरकारने मोठया प्रमाणात कर्जे घेतली होती महसुल आणि सरकारी कर्जे या स्वरूपात उभारलेल्या पैशाचा विनियोग फारच कमी प्रमाणात जनतेच्या हितासाठी केला जायचा 1858 मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त केल्यानंतर कंपनी सरकारवर असलेल्या 693 लाख पौंड

खर्चाचा बोजा भारतीय जनतेवर टाकुन ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेवर कसा अन्याय केला याचे विश्लेषन डॉ. आंबेडकरांनी केले.

भारताने इंग्लंडसाठी प्रचंड आर्थिक योगदान दिले परंतु इंग्लंडचे भारतासाठी मात्र नगण्य आर्थिक योगदान राहिले अशी टीका डॉ. आंबेडकरांनी केली.

## रूपयाचा प्रश्न : उद्गम आणि विकास

The Problem of the Rupee : Its origin and its solution हा डॉ. आंबेडकरांचा मौद्रिक अर्थशास्त्रावरील महत्वाचा प्रबंध होय. हा प्रबंध 1923 मध्ये प्रकाशित करण्यात आला. याच प्रबंधावर त्यांना डी. एस्सी. ही सर्वोच्च पदवी प्रदान करण्यात आली होती. हाच ग्रंथ 1947 मध्ये History of Indian Currency and Banking या नावाने प्रकाशित करण्यात आला. प्रस्तूत ग्रंथात भारतीय रूपयाच्या उत्क्रांतीची ऐतिहासीक मीमांसा करण्यात आली. 1800 ते 1893 या काळात भारतीय रूपयाची चलनाचे परिमाण म्हणून कशी जडणघडण होत गेली. त्याबद्दल डॉ. आंबेडकरांनी सविस्तर विवेचन केले. भारतासाठी आदर्श चलन पध्दत कोणती? या अत्यंत महत्वाच्या विषयावर त्यांनी मूलगामी विचार मांडलेत.

1853 पूर्वी भारतात सुवर्ण मानक आणि रूपयाचे रौप्य मानक अशी द्विमान चालनपध्दती प्रचलित होती 1835 च्या कायद्यानुसार सुवर्ण मानक रद्द करून देशभर एकधातुमानावर आधारीत चलन पध्दती सुरू झाली. त्यानुसार रूपयाच्या परिणामाच्या स्वरूपात चलन पध्दतीचे एकसुत्रीकरण करण्यात आले. 180 ग्रॅम ट्राय वजनाचे, 165 ग्रॅम चांदी असलेला रूपया हे एकमेव चलन संपूर्ण देशभर प्रस्थापित करण्यात आले. त्यामुळे भारतात रौप्य मानकाची सुरवात झाली. परंतु ही पध्दत देशाच्या गरजा भागविण्यासाठी अपर्याप्त असल्याची लवकरच जाणीव होऊ लागली. त्यासाठी दोन कारणे जबाबदार होती.

1. देवाणघेवाणीसाठी चलनाचा वापर मोठया प्रमाणावर वाढला.
2. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढून चलनाचा वापर वाढला.

डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की रौप्य मानकाच्या मर्यादा स्पष्ट झाल्यानंतर देखील सुवर्णमानकाचा स्विकार न करता रौप्यमानकाच्या जोडीने सरकारी कागदी चलनाला चंचूप्रवेश करण्यात आला. ही बाब चलनाच्या संदर्भात अतिशय दुर्दैवी घटना होती.

1873 पर्यंत भारतीय रूपया आणि ब्रिटीश पौंड यांच्यातील विनिमयाचा दर 1 रूपया = 1 स्टर्लिंग पाऊंड आणि साडे दहा पेन्स या पातळीवर होता. याचा अर्थ सोने आणि रूपये यांच्यातील विनिमय दर 1 औंस सोन्यास साडे पंधरा औस चांदी असा होता. परंतु 1876 नंतर मात्र सोने आणि चांदी यांच्यातील विनिमयाचा दर स्थिर ठेवणे कठीण झाले. विनिमयाचा हा दर स्थिर न राहण्याची दोन कारणे डॉ. आंबेडकरांनी नमूद केलीत.

1. पहिले म्हणजे युरोपमध्ये त्यावेळी झालेले चांदीचे निमुद्रीकरण होय
2. दुसरे सोन्याच्या तूलनेत चांदीच्या उत्पादनात आलेली प्रचंड वाढ आणि त्यातून कमी झालेली चांदीची म्हणजेच चांदीच्या चलनाची किंमत होय.

सोने आणि चांदीच्या तुलनात्मक उत्पादनाच्या आकडेवारीचा तपशीलवार आढावा घेऊन डॉ. आंबेडकरांनी असा निष्कर्ष काढला की रूपयाच्या अवमूल्यनात चांदीचा अतिरिक्त पुरवठा जबाबदार नाही तर जगातील प्रमुख देशांनी रौप्यमानकाचा त्याग केल्यामुळेच रूपया पौंड विनिमय दरात विसंवाद निर्माण झाला.

सोने चांदीच्या विनिमय दर स्थिर ठेवणे कठीण झाल्यामुळे भारताचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. याबाबातचे सविस्तर विवेचन डॉ. आंबेडकरांनी केले. डॉ. आबेडकर स्पष्ट करतात की भारत हा स्वतः रौप्यमानक स्वीकरलेला परंतु सुवर्णमानक स्विकारलेल्या देशांशी घनिष्टपणे जखडलेला देश असल्यामुळे त्याचे आर्थिक व वित्तीय जीवन सोने आणि चांदीच्या तुलनात्मक किंमतीवर अंमल गाजविणाऱ्या आणि पर्यायाने रूपया पौंड विनिमय दराचे नियंत्रण करणाऱ्या आंधळया शक्तीच्या अधीन होते. या सर्व घटनांची तार्किक परिणती म्हणून पुन्हा सुवर्ण मानकाची मागणी पुढे आली. भारतासाठी भविष्यकाळाच्या दृष्टीकोनातून आदर्श चलन पध्दत कोणती? या संदर्भात अर्थतज्ञांपुढे दोन प्रमुख पर्याय होते.

1. सुवर्णमानक – ज्यात सोन्याच्या नाण्यांचा वापर चलन म्हणून अभिप्रेत असतो.
2. सुवर्ण विनिमय मानक – ज्यात कागदी नोटांचा चलन म्हणून वापर होतो. कागदी रूपये घेऊन ठराविक दराने सोने देण्याची सरकारकडून हमी घेतली जाते.

सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रोफेसर केन्स आणि इतर अर्थशास्त्रज्ञांनी सुवर्ण विनिमय मानकाचा पुरस्कार केला. होता. त्यांच्यामते हे परिमाण लवचिक आहे. परंतु डॉ. आंबेडकरांनी त्याला कडाडून विरोध केला. त्यांच्या मते सुवर्ण मानक हेच भारतासाठी योग्य होते. आपल्या युक्तीवादाच्या समर्थनासाठी ऐतिहासिक पुरावे देऊन सुवर्णमानक असताना भारतातील रूपयाच्या किंमती कशा स्थिर होत्या याचे पुराव्यासहीत विवेचन केले सुवर्ण विनिमय मानक प्रचलित असताना रूपयाचे मूल्य घसरले. परिणामतः भाववाढ झाली हे त्यांनी स्पष्ट केले.

भारतातील चलन आणि वित्ताच्या रॉयल कमिशनपुढे अर्थशास्त्रज्ञ डॉ. आंबेडकरांनी 15 डिसेंबर 1925 ला साक्ष देताना स्पष्टपणे नमूद केले होते की चलन निर्मिती करणाऱ्या संस्थेच्या चलन निर्मितीच्या क्षमतेवर अंकुश असण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अनिर्बंध चलनपुरवठा आणि त्यातून भाववाढ होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते.

आज एवढया वर्षानंतर देखील चलननिर्मितीच्या क्षमतेवर परिणामकारक नियंत्रण ठेवण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी मांडलेले विचार महत्वाचे आहे भारतीय रूपयाच्या अवमूल्यनाचा प्रश्न आजसुध्दा कायम आहे.

*** शेती हे आर्थिक विकासाचे साधन :–** शेती हे केवळ पोट भरण्याचे साधन नाही, तर ते राष्ट्रीय उत्पादनाचे एक मोठे साधन आहे. या साधनाकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून पाहू नये तर ते आर्थिक विकासाचे साधन म्हणुन त्यास विशेष महत्व दिले पाहीजे शेतीमध्ये त्या दृष्टिने वाढावा (Surplus) निर्माण झाला पाहीजे. याचा अर्थ बाबासाहेब हे मोठया जमीनाधारणेस अनुकूल होते असे नाही. शेतीत वाढावा निर्माण होण्यासाठी शेतीची उत्पादकता वाढवली पाहीजे असे त्यांना वाटत होते शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी शेतीमधील अतिरिक्त लोकसंख्या उद्योगधंद्याकडे स्थलांतरित केली पाहीजे किंवा तेथील लोकांना दुय्यम उत्पादनाची साधने पुरविली पाहीजेत असे त्यांचे मत होते औद्योगिकीकरणामुळे शेती क्षेत्रावरील लोकसंख्येचा भार कमी होईल आणि जमीनीचे तुकडीकरण थांबेल जमीनिच्या व शेतमालाच्या किंमती वाढतील आणि शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावेल असे बाबासाहेबांना वाटत होते.

*** जलसंपत्तीच्या नियोजनासंबधी विचार :–** 1942 ते 1946 पर्यंत गव्हर्नर जनरलच्या कार्यकारिणीचे सदस्य असताना डॉ. आंबेडकरांनी नदीच्या पाण्याचे नियोजन करण्याबाबत अनेक योजना तयार करण्यात आल्या. त्यापैकी दामोदर खोरे परियोजना ही एक होय त्यांची ही योजना बहुद्देशीय होती. नदीला येणाऱ्या महापुरापासून संरक्षण करणे एवढाच मर्यादीत उद्देश नव्हता तर या योजनेद्वारे शेतीसाठी सिंचन विद्युतनिर्मिती आणि नौकायन असा तिहेरी उद्देश होता. 'दामोदर खोरे योजना' ही डॉ. आंबेडकरांच्या जल नियोजनाची प्रत्यक्ष साक्ष आहे. आज देशात मोठ–मोठया धरण योजना राबवल्या जात आहे. त्या योजनांचा पाया त्यांनी मांडलेल्या विचारांवर आधारित आहे.

*** शेतीचे राष्ट्रीयीकरण :–** डॉ. आंबेडकरांनी मार्च 1947 मध्ये भारतीय संविधान सभेला एक निवेदन सादर केले होते. त्यामध्ये त्यांनी शेतीचे राष्ट्रीयीकरण करण्याची शिफारस केली होती मुलभुत उद्योग आणि विमा या उद्योगाप्रमाणेच सर्व जमीन शासनाने आपल्या ताब्यात घ्यावी शेतीचे राष्ट्रीयीकरण केल्यानंतर रहिवाशांना काही अटीवर शेती करण्यासाठी द्यावी.

1. सामुदायीक शेती म्हणून शेती करण्यात येईल शासनाने तयार केलेल्या अधिनियमानुसार शेती करण्यात येईल.
2. जात किंवा इतर कोणत्याही गोंष्टींच्या आधारे गावकऱ्यांमध्ये भेदभाव न करता सर्वाना सामुदायीक शेतीमध्ये सहभागी होता येईल त्यामुळे कुणी जमीनदार, कुळ आणि शेतमजुर राहणार नाहीत.
3. शासन शेतकऱ्यांना पैसा, पाणी, बी– बीयाणे, खते पुरवेल.
4. शेतीमधील उत्पादनातुन शेतसारा आणि शासनाने केलेले खर्च शेतकरी शासनास देतील.

## विकासाची अर्थनीती :–

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेसाठी विकासाची अर्थनीती काय असावी? याचे अभ्यासपुर्ण विवेचन डॉ. आंबेडकरांनी स्टेटस अँड मायनॉरिटीज या आपल्या ग्रंथात केल्याचे दिसते. याबाबतीत त्यांनी गरीबी हटविणे, विषमता निर्मुलन आणि शोषणमुक्तता या तत्वत्रयीचा आग्रह धरला आहे.

डॉ. आंबेडकर या ग्रंथामध्ये म्हणतात खाजगी उद्यमशीलतेला धक्का न लावता जनतेची उत्पादकता जास्तीत जास्त राहील आणि संपत्तीचे वाटप समानशील होईल अशा पध्दतीने आर्थिक व्यवहाराचे नियोजन करणे ही राज्यसंस्थेची जबाबदारी आहे.

राष्ट्रीयीकरणाला डॉ. आंबेडकरांचा विरोध नव्हता मात्र उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या हाती एकवटलेली पाहीजे अशी मार्क्सवादी अतिरेकी भुमिका त्यांनी घेतली नाही. त्यांनी पुरस्कार केला तो मर्यादीत राष्ट्रीयीकरणाच्या शेतजमीन आणि अवजड उद्योगधंदे यावर सामुदायिक मालकी असावी अशी त्यांची धारणा होती. शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करून सामुदायिक लागवड करावी आणि उत्पादनाचे लोकशाही पध्दतीने जातीभेद न करता वाटप करावे म्हणजेच गरीबांना न्याय देता येईल अशी आंबेडकरांची भूमिका होती.

## निष्कर्ष :

1. इस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीतीवरून स्पष्ट होते की 1792 ते 1856 या काळात कंपनी सरकार पर्यायाने ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेची पिळवणूक केली.
2. ब्रिटीश काळात सोने–चांदीचा विनिमय दर स्थिर ठेवणे कठीण झाल्यामुळे भारताचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असे दिसुन येते.
3. नदीच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी दामोदर नदी खोरे योजना, महानदी खोरे योजना इ. अनेक योजना तयार करून त्या प्रत्यक्षात कार्यन्वित केल्या त्यामुळे भारताचा कृषी व औद्योगिक विकास होण्यास मदत झाली झाली.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले की शेती हे राष्ट्रीय उत्पादनाचे एक मोठे साधन आहे हे आजच्या काळात सुध्दा तंतोतंत लागु पडत आहे.
5. शेतीचे राष्ट्रीयीकरण केल्यास सामुहीक शेतीला उत्तेजन दिल्यास कुळ आणि शेतमजुर यांच्यातील दरी (विषमता) कमी होण्यास मदत झाली आहे.
6. डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रीयीकरणाला विरोध नव्हता परंतु राष्ट्रीयीकरण मर्यादित असावे. खाजगी उद्यमशीलतेला धक्का लागु नये यावर त्यांनी भर दिल्याचे दिसते.

## संदर्भ ग्रंथ सुची :–


1. निंबाळकर वामन, संपादक ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा'' प्रबोधन प्रकाशन, नागपूर, पहीली आवृत्ती 14 ऑक्टो.2006 पृ. 111 ते 126.
2. नलावडे . त्र्य. प्रमोद, ''लोकराज्य मासीक डिसेंबर 2013, अंक 9, माहीती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. 32, 57 व 58.
3. पवार दया, (संपादक) ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ'', महाराष्ट्र राज्य साहीत्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 40032, प्रथम आवृत्ती 24 डीसेंबर 1993, पृ. 374 आणि 375.


LBP PUBLICATION